# महाराष्ट्र शासन

**Email ID: neela.ranade@nic.in**
फोन नं. 022-22014419

क्र. जीपीडीपी २०१९/ प्र.क्र. ६०/ पं.रा.६
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन इमारत,
२५, मर्झबान पथ, मुंबई-४००००१.
दि. १७ ऑक्टोबर, २०१९.

प्रति,

अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव
[शालेय शिक्षण विभाग/ सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग/ महिला व बाल कल्याण विभाग/ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग/ उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा)/ उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग)/ कृषि व पदुम विभाग(पदुम)/ कृषि व पदुम विभाग(कृषि)/ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग/सार्वजनिक आरोग्य विभाग/ मृद जलसंधारण व रोहयो विभाग/ उच्च व तंत्रशिक्षण विभाग/ गृहनिर्माण विभाग/ अन्न व नागरी पुरवठा विभाग/ सार्वजनिक बांधकाम विभाग/ महसूल व वन विभाग (वन)/ महसूल व वन विभाग (महसूल)]

विषय :- "सबकी योजना सबका विकास" - ( **People's Plan Campaign** ) मोहिम राबविणेसाठी राज्य शासनाच्या नोडल अधिकाऱ्यांचा तपशील उपलब्ध करुन देणेबाबत....

संदर्भ - संचालक, राज्य प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पुणे यांचे दि.०९.१०.२०१९ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

केंद्र शासनाच्या ग्राम विकास व पंचायती राज मंत्रालयाने "सबकी योजना सबका विकास" ( People's Plan Campaign ) लोकसहभागातून लोकांचा ग्रामपंचायत विकास आराखडा ही मोहीम दिनांक २ ऑक्टोबर, २०१९ ते ३१ डिसेंबर, २०१९ या कालावधीत राबविणेचे निश्चित केले असून या मोहीमे अंतर्गत देशातील सर्व ग्रामपंचायतींचे सन २०२०-२१ चे वार्षिक आराखडे व सन २०२० ते २०२५ पर्यंतचे पंचवार्षिक आराखडे तयार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. केंद्र शासनाच्या या महत्वाकांक्षी मोहिमेचे संपूर्ण देशभर उपरोक्त कालावधीत नियोजन करण्यात आलेले आहे. यास अनुसरुन मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.१७ सप्टेंबर, २०१९ रोजी सर्व विभागांच्या सचिवांशी झालेल्या बैठकीमध्ये सदर मोहिम विहीत वेळेत राबविण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

"सबकी योजना सबका विकास" या मोहिमेचे संपूर्ण सनियंत्रण केंद्र शासनाकडून ऑनलाईन पध्दतीने होत असल्याने http://gpdp.nic.in या वेबसाईटवर आवश्यक माहिती अपलोड करावयाची आहे. राज्य शासनाच्या

विविध विभागांचा समावेश या वेबसाईटवर करण्यात आलेला असून विभागाच्या नोडल अधिकाऱ्यांची माहिती अपलोड करणे आवश्यक आहे.

तरी, आपल्याशी संबंधित विभागांची नोडल अधिकाऱ्यांची माहिती संदर्भाधिन पत्रात दिलेल्या विवरणपत्राप्रमाणे त्वरित राज्य प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पुणे यांच्या spdmaharashtra@gmail.com या ई-संदेशावर परस्पर पाठवावी व त्याची एक प्रत या विभागाच्या उपरोक्त ई-संदेशावर पाठविण्यात यावी, ही विनंती.

आपली,

( नीला रानडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे.
प्रत माहितीसाठी,
राज्य प्रकल्प संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ए विंग, शिवसागर अपार्टमेंट, मोदीबाग, गणेशखिंड रोड, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.